**नि.क्र.२५**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ याची जबानी –**
**मी याद्वारे असे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :**

माझे नांव : पराग आनंद परुळेकर
वय सुमारे : ४५ वर्षे, धंदा – व्यवसाय
निवासस्थान : राहा.ओरोस, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग

---

**अभियोग पक्षातर्फे सरतपास सहा.सरकारी वकील श्री.जे.आर.माजगावकर यांचेमार्फत –**

**०१.** मला सिंधुदुर्गनगरी पोलीसांनी मला २२/०१/२०२४ रोजी ओट्रा रेंसीडेन्सी, ओरोसच्या समोर अपघात झाला होता त्याठिकाणी बोलावले होते. पोलीसांनी मला त्या जागेचा पंचनामा करावयाचा आहे असे सांगीतले. अपघाताचे ठिकाण मला ट्रक ड्रायव्हर म्हेत्रे व गोसावी पोलीस यांनी दाखविला. पोलीस व म्हेत्रे यांनी मला सांगीतले की, आदल्या दिवशी एका मोटार सायकलला ट्रकने मागून धडक दिली व अपघात झाला. मी पाहीले की ओरोस हून कसाल कडे जाणा–या रस्त्याच्या कडेला अपघातातील मोटार सायकल उभी होती. तेथे अन्य कोणतेही वाहन नव्हते. ती मोटार सायकल बुलेट होती व तीचा नंबर एमएच–०७–१६०० असा होता. ज्या ट्रकने मोटार सायकलला धडक दिली त्या ट्रकचा नंबर मला सांगता येत नाही. त्या ट्रकचे चालक म्हेत्रे तेथे हजर होते. त्या मोटार सायकलचा पाठीमागील इंडीकेटर व टेल लाईट तुटलेली होती. पोलीसांनी दिसली परिस्थीती लिहून घेतली, ती लिहून झाल्यानंतर मला वाचायला दिली व त्यावर वाचून सही केली. आता मला नि. पी–१/पीडब्ल्यु १ वरील दिनांक २२/०१/२०२४ रोजीचा पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपी तर्फे उलटतपास सन्माननीय वकील श्री.ए.ए.शेख यांचेमार्फत –**

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी हजर राहणेबाबत पत्र अथवा नोटीस दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी म्हणत असलेले

घटनास्थळ मुंबई गोवा महामार्गावर असून तेथे सतत वाहनांची वर्दळ असते. हे म्हणणे खरे आहे की, मी अपघात होताना पाहीलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे अपघात कसा घडला व कोणाच्या चुकीमुळे घडले हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी म्हणत असलेल्या पंचनाम्याच्या वेळी अपघातातील वाहने अपघातच्या ठिकाणी नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी म्हणत असलेली बुलेट बाजुला लावली होती व वर्दळ चालू होती.

**०३.** हे म्हणणे खरे आहे की, मी म्हणत असलेल्या अपघातस्थळाजवळ ओट्रा रेसीडेन्सी नावाची इमारत आहे, तेथे अनेक सदनिकाधारक राहतात. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळाच्या चतु:सिमा सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, असे काही घडले नाही की, मी दिसली परिस्थीती सांगत होतो व त्याप्रमाणे पोलीस लिहून घेत होते. हे म्हणणे खरे आहे की, मी व फिर्यादी गणेश भिकाजी झगडे दोघेही ओरोस गावचे आहोत. हे म्हणणे खरे नाही की आम्हा दोघांची ओळख आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वत: टेपने घटनास्थळावरील रस्त्याची रुदी वगैरे मोजली नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस श्री.पी.एस.गोसावी माझे परिचयाचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगीतल्याप्रमाणे दिनांक २२/०१/२०२४ रोजी कोठेही पंचनाम्यासाठी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, केवळ पोलीस गोसावी ओळखीचे असल्याने पोलीसांनी पोलीस ठाण्यात बसुन लिहीलेल्या पंचनाम्यावर मी सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील संपूर्ण मजकूर चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी चुकीची साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास** — नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by AVADHUT GAJANAN DESHINGKAR
Date: 2026.01.05 11:15:10 +0530

ठिकाण :– ओरोस
दिनांक :–०३/०१/२०२६.

**( ए.जी.देशिंगकर )**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग–ओरोस.